**<u>जाब देणार यांच्या साक्षीदार क्र. 1 चा उलटतपास : तक्रारदारातर्फे श्री. व्ही. बी. मालानी वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. मी सन 2005 पासून सामनेवाला बॅंकेमध्ये लिगल ऑफीसर म्हणून काम पाहात आहे. मी 2005 पुर्वीचे नेमणूक झालेल्या कर्मचा–यांचे व अधिका–यांचे रेकॉर्ड तपासलेले आहे. मला प्रस्तुत प्रकरणातील केसची संपुर्ण माहिती आहे. हे मी सांगू शकत नाही की, तक्रारदार यांची बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक बीड मध्ये कोणत्या वर्षी नेमणूक झाली व काय म्हणून नेमणूक झालेली आहे. मला रिव्हीजन क्र. 72/2018 मधील दि. 17/01/2025 रोजीच्या आदेशाची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. सी–32 वरील दस्तामधील पान क. 3 ते 16 पानांवर ते कधी तयार केले व कोणी तयार केले त्याबाबत नमूद नाही. मी तक्रारदार हे ईन्व्हर्टवर व इतर विजेच्या उपकरणासाठी लागणा–या बॅटरीचा पुरवठा करण्याचा व्यवसाय करतात त्याबाबतचा दस्त ऐवज दाखल करू शकतो. हे मला सांगता नाही येणार की, तक्रारदार हे सदर व्यवसाय कोणत्या नावाने करतात व कोणत्या तारखेपासून करतात. मी सामनेवाला बॅंकेचे 2010–2011 सालामध्ये झालेले ऑडीट पाहिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन 2010 व 2011 सालच्या ऑडीट रिपोर्टमध्ये बॅंकेच्या राजेगाव शाखेमध्ये कोणताही अपहार झालेला नाही त्याबाबत नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांना सस्पेंड केल्यानंतर त्यांची खातेनिहाय चौकशी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील सर्व मजकूर हा चुकीचा लिहलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांनी बॅंकेने सस्पेंड केल्यापासून आजपर्यंत कोणतीही नोकरी अथवा व्यवसाय केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला तक्रारदार यांच्या व्यवसायाचे नाव सांगता आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बॅंकेच्या अधिका–यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.03.24 13:13:21 +0530

LABOUR COURT MAHARASHTRA

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–23/03/2026